# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक ०९/०५/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक ०९/०५/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम, पाणीपुरवठा, आरोग्य, कर विभाग व पाणीपट्टी विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र | विषय |
|---|---|
| | बांधकाम विभाग |
| १ | प्र. क्र. ८ मध्ये इमरान मेंबर ते इरफान मौलाना यांच्या घरापर्यंत नाली बांधकाम करणे. |
| २ | मलकापूर शहर अंतर्गत अशोक नगर प्रमुख रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे. |
| | पाणीपुरवठा विभाग |
| ३ | पाणीपुरवठा विभाग विहित कामाचे मान्सून पूर्व नियोजन करण्याबाबत |
| | आरोग्य |
| ४ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण व प्लास्टिक वापर बंदी बाबत जनजागृती करिता साहित्य खरेदी करणे बाबत. |
| | कर विभाग |
| ५ | आयकर, जीएसटी व व्यवसाय कर भरण्याकरिता सनदी लेखापाल ची नियुक्ती करणे बाबत. |
| ६ | सन २०२२-२३ आर्थिक वर्षाचे लेखे दुहेरी लेखा नोंद पद्धतीने सनदी लेखापाल यांचे कडून तयार करणेबाबत. |
| ७ | मलकापूर नगर परिषदेतील कर संग्रहक यांच्याकरिता कंत्राटी पद्धतीने मदतनीस उपलब्ध करून देण्याबाबत. |

---

**विषय क्र.१ :- प्र. क्र. ८ मध्ये इमरान मेंबर ते इरफान मौलाना यांच्या घरापर्यंत नाली बांधकाम करणे.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. आमदार श्री राजेश एकडे साहेब मलकापूर विधानसभा मतदारसंघ यांचे पत्र क्र. २१- मविस/M/७४१/२०२३ दि ३१/०३/२०२३ नुसार पारपेठ भागातील नागरिकांच्या तक्रारीनुसार प्र. क्र. ८ मध्ये इमरान मेंबर ते इरफान मौलाना यांच्या घरापर्यंत नाली बांधकाम करणे हे काम करण्याबाबत सुचविले आहे. त्यानुसार सदर काम करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न. प फंडच्या निधी उपलब्धतेनुसार करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र. २ :- मलकापूर शहर अंतर्गत अशोक नगर प्रमुख रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार मा. रक्षाताई खडसे रावेर लोकसभा मतदारसंघ यांचे पत्र क्र. मु.ऑ/५८३/२०२२ दिनांक ०९/११/२०२२ नुसार मलकापूर शहर अंतर्गत अशोक नगर प्रमुख रस्ता कॉंक्रिटीकरण करणे बाबत नमूद केले आहे. त्यानुसार स्थळ निरीक्षण केले असता सदर ठिकाणी रस्त्याबरोबरच नाली बांधकाम करणे सुद्धा जरुरीचे असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सदर ठिकाणी रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे या कामास व येणारा खर्च नगरोत्थान योजने अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.३ :- पाणीपुरवठा विभाग विहित कामाचे मान्सून पूर्व नियोजन करण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून पा.पु. अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मलकापूर शहराचा पाणीपुरवठा मौजे धुपेश्वर येथील हतनूर धरणाच्या बॅंक वॉटर वर अवलंबित असून सदर ठिकाणी पाणी स्थिर नसल्यामुळे व त्यात मोठ्या प्रमाणात गाळ असल्याने, पावसाळ्याच्या दिवसात शहरात गाळ मिश्रित पाणीपुरवठा होतो. त्यामुळे हे गाळ मिश्रित पाणी संपूर्ण शुद्ध करणे बऱ्याच वेळा शक्य होत नाही. त्यासाठी दरवर्षी विविध उपाय योजना करणे गरजेचे असल्याचे नमूद केले आहे. त्या उपाययोजना खालील प्रमाणे.

१)मुबलक प्रमाणात तुरटी, ब्लिचिंग, PAC जेली, पावडर साठा उपलब्ध ठेवणे.
२)सेटलिंग टॅंक, शुद्ध पाणी संप, फिल्टर वॉटर संप, क्लॅरिफायर, फिल्टर ड्रेन, ड्रेन मॅनहोल चेंबर यांचा गाळ काढणे.
३)नळगंगा पंपिंग स्टेशन, धुपेश्वर पंपिंग स्टेशन येथील गाळ काढणे खोलीकरण करणे.
४)नळगंगा नदी पात्रात तात्पुरता बंधारा बांधणे.
५)नळगंगा पंपिंग स्टेशन दुरुस्ती करणे.
६)सेटलिंग टॅंक ड्रेन व्हॉल गाळ काढणे व व्हॉल दुरुस्त करणे.
७)विविध ठिकाणी पाणी डोसिंग अरेंजमेंट करणे.
८)मड पंप दुरुस्ती करणे व खरेदी करणे.
९)लोखंडी ब्रिज दुरुस्त करणे.
१०)उंच टाकी (ESR) मधील गाळ काढणे व त्या स्वच्छ धुऊन काढणे.
११)मौजे वाकोडी येथून पाणी उचल करणे व त्यासाठी त्यांचे विद्युत देयक अदा करणे.
१२)मौजे वाकोडी येथील पाईपलाईन दुरुस्ती करणे तसेच नवीन पाईपलाईन वाकोडी टाकी पासून टाकणे.
१३)मुख्य पाईपलाईन वरील मोठ्या गळती त्वरित बंद करणे.
१४)नाली तील बंद नळ, वाहते नळ बंद करणे.
१५)नळगंगा धुपेश्वर पंपिंग स्टेशन येथे नवीन व्ही.टी. पंप घेणे.
१६)नळगंगा नदी पात्रातील पाणी उचलण्यासाठी तरंगते पंप घेणे व इतर आवश्यक खर्च करणे.

वरील उपाय योजना या दरवर्षी करणे गरजेचे असून त्या करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च पाणीपुरवठा बंधनकारक अनुदान, १५ वा वित्त आयोग, न.प. निधी अथवा इतर उपलब्ध निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.४ :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण व प्लास्टिक वापर बंदी बाबत जनजागृती करिता साहित्य खरेदी करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून प्र. आरोग्य निरीक्षक यांनी दिलेला अहवालानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत प्लास्टिक बंदी बाबत जनजागृती करण्याकरिता विविध कार्यालयीन लिफाफे, पाकिटे, महिला कर्मचाऱ्यांसाठी एप्रन, पुरुष कर्मचाऱ्यांसाठी टी-शर्ट, कॅप, कार्यालयीन वापरासाठी बॉक्स फाईल, स्प्रिंग फाइल्स, बिल बुक, डायरी, प्लास्टिक बंदी बाबत जनजागृतीसाठी जूट बॅग व विविध कार्यालयीन नोटिसेस, दाखले, प्रमाणपत्र इत्यादीसाठी A-४ पांढरे व सेंचुरी पेपर हे साहित्य खरेदी करणे आवश्यक असल्यामुळे सदर साहित्य खरेदी करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च IEC निधीच्या अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.५ :- आयकर, जीएसटी व व्यवसाय कर भरण्याकरिता सनदी लेखापाल ची नियुक्ती करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून लेखापाल व लेखापरीक्षक यांनी सादर केलेला अहवालानुसार दरवर्षीप्रमाणे आर्थिक वर्ष सन २०२३-२४ करिता कर्मचारी यांचे वेतनातून व कंत्राटदार यांचे देयकातून कपात आयकर व जी.एस.टी. चे टी.डी.एस. व व्यवसाय कर शासन खाती भरणे गरजेचे आहे. त्याकरिता नगरपरिषद सनदी लेखापाल यांची नियुक्ती करत असते. तरी सदर नियुक्ती निविदा प्रक्रियेद्वारे होत असून सदर कामास अंदाजे एक ते दीड लाख रुपये खर्च अपेक्षित असून सदर कामास निविदा प्रक्रिया राबविण्यास व येणारा खर्च न. प. निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.६ :- सन २०२२-२३ आर्थिक वर्षाचे लेखे दुहेरी लेखा नोंद पद्धतीने सनदी लेखापाल यांचे कडून तयार करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून लेखापाल व लेखापरीक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार नगरपरिषदेचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे लेखे दुहेरी लेखा नोंद पद्धतीने तयार करावयाचे आहेत. सदर कामाकरिता सनदी लेखापाल यांची निवड करणे गरजेचे आहे. त्याकरिता निविदा प्रक्रिया राबवणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर कामाच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न. प. निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.७ :- मलकापूर नगर परिषदेतील कर संग्रहक यांच्याकरिता कंत्राटी पद्धतीने मदतनीस उपलब्ध करून देण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून उपमुख्याधिकारी तथा कर अधीक्षक यांनी सादर केलेला अहवालानुसार मलकापूर न. प. हद्दीत जवळपास १९,००० मालमत्ता असून या सर्व मालमत्तांचे नवीन मागणी रजिस्टरला नोंद करणे, थकीत कराची नोंद करणे, नवीन कर लिहिणे, थकीत कर बिल तयार करणे तसेच बिलांचे वाटप करणे ही सर्व कामे कर संग्रहकास करावी लागतात. तसेच आज रोजी मलकापूर न.प. तील कर विभागात फक्त ४ कर संग्रहक कार्यरत असून ३१ मार्च २०२३ रोजी २ कर संग्रहक वयोमर्यादेनुसार सेवानिवृत्त झाले असून रिक्त झालेला पदावर अद्याप नवीन नियुक्ती झालेली नाही. त्यामुळे थकित करांची बिल मालमत्ता धारकांपर्यंत पोहोचण्यास विलंब होत आहे. तसेच कर संग्रहक प्रत्येक मालमत्ताधारकापर्यंत पोहोचू न शकल्यामुळे परिणामी थकीत कर वसुलीचे प्रमाण कमी होत

आहे. सदर अडचण दूर करण्यासाठी कर संग्रहक यांना कंत्राटी पद्धतीने मदतनीस उपलब्ध करून दिल्यास विलंबित होणारी कामे वेळेत पूर्ण होऊन कर वसुलीचे प्रमाण देखील वाढेल असे नमूद केलेले आहे

ठरविण्यात येते की, मलकापूर नगर परिषदेच्या कर विभागात प्रलंबित असलेली कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी व कर संग्रहकाना सहाय्यता मिळून थकीत कर वसुली मध्ये प्रभावी वाढ होण्याच्या दृष्टीने कर संग्रहकाना आवश्यकते नुसार कंत्राटी पद्धतीने मदतनीस उपलब्ध करण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यास व येणारा खर्च न. प निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**